लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शुक्रवार – ११ ऑगस्ट २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १३२
पाने – ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com


लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक
ऑगस्ट महिन्याच्या तारखा
◂ दर मंगळवारी ▸
1 8 22 29
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.

# इतिहास, भविष्याचा वेध घेणारा असतो

## ‘शौर्यगाथा मराठवाडा मुक्ती संग्रामाची’ व्याख्यानमालेत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर : अन्यायकारक निजाम राजवटीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी देण्यात आलेला लढा हा मराठवाड्याची अस्मिता आहे. या लढ्याचा इतिहास या भूमीत जन्मलेल्या प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक आहे. हा लढा आणि या लढ्यातील लातूर जिल्ह्याचे योगदान भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ‘शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची’ ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून मुक्तिसंग्रामातील वीरांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाची शौर्यगाथा पुढील पिढीला समजावी, यासाठी जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा माहिती कार्यालय व बाबासाहेब परांजपे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ‘शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची’ ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली असून ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव गोमारे, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, डी. एन. शेळके, मुख्याधापक एस. एम. वाघमारे यावेळी यावेळी उपस्थित होते.

इतिहास हा भविष्याचा वेध घेणारा असतो, आपण ज्या भूमीत राहतो, तेथील इतिहास आपण जाणून घ्यायला हवा. आपल्या भूमीला अन्यायकारक राजवटीच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी मराठवाडा मुक्तिसंग्रामात अनेक शूरांनी हौतात्म्य पत्करले. त्यांचा इतिहास आपल्याला देश, समाजाप्रती समर्पण, त्याग शिकविणारा असून या इतिहासापासून प्रेरणा घ्यावी. सर्वांनी आपल्या मनात माणुसकीची ज्योत तेवत ठेवून देशासाठी, समाजाच्या कल्याणासाठी कर्तव्य भावनेने काम करून विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे ऐतिहासिक महत्व खूप वेगळे आहे. या लढ्याचा इतिहास विद्यार्थ्यांना माहिती व्हावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने ‘शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची’ ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी यापुढेही विविध उपक्रम आयोजित केले जाणार असून यामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही चार मोठ्या संस्थानांनी भारतामध्ये सहभागी होण्यास नकार दिला होता. त्यामध्ये हैद्राबाद संस्थानाचाही समावेश होता. संस्थानाचे विलीनीकरण व्हावे, यासाठी केंद्र शासनाकडून प्रयत्न सुरु होतेच, सोबत या संस्थानातील नागरिकांनीही लढा उभारला. यामध्ये लातूर जिल्ह्यातही अनेक महत्वपूर्ण लढे लढले गेले. किसान दलाने लढलेला हत्तीबेटचा लढा, लातूरच्या गंजगोलाई येथील टॉवरवरील असफशाही ध्वज उतरवून तिरंगा फडकविल्याची घटना, रझाकार, मुक्तिसंग्रामातील पहिले हुतात्मा वेद प्रकाश, आर्य समाजाचे मराठवाडा मुक्तिसंग्रामातील योगदान याविषयी श्री. उमाटे यांनी विस्तृत माहिती दिली. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास भावी पिढीने समजून घेण्याची आवश्यकता असल्याचे व्याख्याते भाऊसाहेब उमाटे यांनी सांगितले. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा अमृत महोत्सव साजरा करताना या संग्रामातील महत्वाच्या घटनांचा इतिहास सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.प्रारंभी जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी प्रास्ताविकात ‘शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची’ व्याख्यानमाले बाबतची भूमिका विशद केली. डॉ. बी. आर. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## महाराष्ट्र झोपडपट्टी दादा कायद्यांतर्गत दगदाडे वर्षभरासाठी स्थानबद्ध

लातूर : कासारसिरशी पोलीस ठाण्यांतर्गत राहणारा व कायदा सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या डिगंबर उर्फ दिगंबर विठ्ठल दगदाडे (वय २५) रा. कोराळवाडी, ता. निलंगा यास झोपडपट्टी दादा कायद्यांतर्गत स्थानबद्ध करून एक वर्षासाठी कारागृहात रवानगी केली आहे. या कायद्यानुसार कारवाई करण्याच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी संमती दिली आहे. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पद्भार घेतल्यानंतर झोपडपट्टी दादा कायद्यांतर्गत ही तिसरी कारवाई आहे.

# ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते लातुरात ध्वजारोहण



लातूर : स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनी म्हणजेच १५ ऑगस्ट रोजी त्या त्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात येते. पण, सद्या सरकारात अनेक जिल्ह्यांचे पालकमंत्रीच घोषीत केले नाहीत. त्यामुळे कोण मंत्री कोणत्या जिल्ह्यात झेंडावंदन करणार याची उत्सुकता असताना सरकारच्या वतीने कोणत्या जिल्ह्यात कोणते मंत्री झेंडावंदन करतील याची यादी जाहीर केली आहे. त्यात लातूर जिल्ह्याच्या ठिकाणी १५ ऑगस्ट रोजी क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते झेंडावंदन केले जाईल असा उल्लेख आहे. या बातमीनंतर जिल्हाभरात बनसोडे समर्थकांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

राज्य सरकारात एकनाथ शिंदे, फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार आले. मंत्री संख्या कमी असल्याने या सरकारातील एका एका पालकमंत्र्यांवर अनेक जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन या निमित्ताने अनेक जिल्ह्याचे पालकमंत्री पद ज्यांच्यावर सोपविले आहे. ते एकाच जिल्ह्याच्या ठिकाणी ध्वजावंदन करत असत. आता अजितदादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस गट सरकारात सामील झाला आहे. त्या पक्षाचे ९ मंत्री मंत्रीमंडळात आहेत. दरम्यान अद्याप पालकमंत्र्यांची घोषणा करण्यात आली नाही. लातूर जिल्ह्यातून ना. संजय बनसोडे यांचा समावेश कॅबीनेट मंत्री म्हणून झालेला आहे. तेच लातूरचे पालकमंत्री होतील असा राजकीय अंदाज बांधला जात आहे. पण, पालकमंत्र्यांची यादीच घोषीत झाली नाही. राज्य सरकारने यावर तोडगा म्हणून येत्या १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त कोणते मंत्री कोणत्या जिल्ह्यात ध्वजवंदन करतील याची यादी जाहीर झाली आहे. लातूर येथे ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते ध्वजवंदन होईल असे जाहीर करण्यात आले आहे. ही यादी म्हणजे संजय बनसोडे हे लातूरचे भावी पालकमंत्री असतील असा कयास बांधला जात आहे. या बातमीने ना. बनसोडे समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.


कोण करणार ध्वजारोहण.
कोणता मंत्री कोणत्या जिल्ह्यात करणार ध्वजारोहण

देवेंद्र फडणवीस – नागपूर
अजित पवार – कोल्हापूर
छगन भुजबळ – अमरावती
सुधीर मुनगंटीवार – चंद्रपूर
चंद्रकांत पाटील – पुणे
दिलीप वळसे पाटील – वाशिम
राधाकृष्ण विखे पाटील – अहमदनगर
गिरीश महाजन – नाशिक
दादा भुसे – धुळे
गुलाबराव पाटील – जळगाव
रविंद्र चव्हाण – ठाणे
हसन मुश्रीफ – सोलापूर
दीपक केसरकर – सिंधुदुर्ग
उदय सामंत – रत्नागिरी
अतुल सावे – परभणी
संदीपान भुमरे – औरंगाबाद
सुरेश खाडे – सांगली
विजयकुमार गावित – नंदुरबार
तानाजी सावंत – उस्मानाबाद
शंभूराज देसाई – सातारा
अब्दुल सत्तार – जालना
संजय राठोड – यवतमाळ
धनंजय मुंडे – बीड
धर्मराव आत्राम–गडचिरोली
मंगलप्रभात लोढा–मुंबई उपनगर
संजय बनसोडे–लातूर
अनिल पाटील–बुलढाणा
आदिती तटकरे–पालघर

या जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार

जिल्हाधिकारी रायगड–रायगड
जिल्हाधिकारी हिंगोली–हिंगोली
जिल्हाधिकारी वर्धा–वर्धा
जिल्हाधिकारी गोंदिया–गोंदिया
जिल्हाधिकारी भंडारा–भंडारा
जिल्हाधिकारी अकोला–अकोला
जिल्हाधिकारी नांदेड –नांदेड

# स्वातंत्र्यसैनिक गणपतराव फुलारी यांच्या स्मारकासाठी जागा द्या



पानगांव : रेणापूर तालुक्यात पानगांव ग्रामपंचायत ही सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे पानगांव हे जवळ पास विस हजार लोक संख्येचे गाव आसून १९५२ साली ग्रामपंचायत अस्तित्वात आली व पहिले सरपंच म्हणून स्वातंत्र्य सैनिक गणपतराव फुलारी यांची बिनविरोध सरपंच पदी निवड झाली हा इतिहास जागरुक ठेवण्यासाठी त्यांचे स्मारक बांधावे त्यासाठी गांधी चौक पानगांव येथे जागा उपलब्ध करुन द्यावी व स्मारकास बांधण्याची मंजूरी देण्यात यावीया मागणी सह विविध मागण्याचे निवेदन

सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत चव्हाण यांनी ग्रामपंचायत कार्यालयात दिले आहे.

पानगाव भोवताली बारा वाड्या आहेत त्यांचा दैनंदिन संपर्क पानगावशी येतो. येथे आठवडी बाजार पण मोठ्या प्रमाणात भरतो पानगांव ग्रामपंचायत ने लाखो रुपये खर्च करुन चौका चौकात कॅमेरे बसवलेत पण ते सतत बंद असतात त्यामुळे चोरीचे प्रमाण वाढले बंद कॅमेरे चालू करावेत. बाहेर गावाहून येणाऱ्या नागरिक, महिलासाठी गांधी चौक,साठे चौक, शिवाजी चौक,डॉ.अंबेडकर चौक याठिकाणी मुतारी बांधावी असे विविध मागण्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते सुर्यकांत चव्हाण यांनी पानगांव ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी गोपीनाथ टकले व उपसरपंच शिवाजी आचार्य यांना देऊन मागणी केली आहे.

## उदगीर रेल्वे गेटजवळ तरूणाचा मृत्यू

उदगीर : बीदर गेट उदगीर रेल्वे येथे एक तरूण रेल्वे अपघातात मरण पावल्याचे निदर्शनास येत आहे. हा अपघात आहे की, अन्य प्रकार हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

२७ वर्षे वयाचा एक तरूण रेल्वे पटरीला लागून मृत्तावस्थेत आढळून आला. तो रेल्वेच्या धक्क्याने मरण पावल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सुरूवातीस त्याची ओळख पटली नाही. मात्र, पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्या तरूणाच्या खिशामध्ये आधार कार्ड आढळून आले. त्या आधार कार्डावर दत्ता नागनाथ बुद्रुक्षे रा. देवर्जन, ता. उदगीर असे नाव आढळून आले. त्यानुसार चौकशी करता हा मयत तरूण दत्ता बुद्रुक्षेच असल्याचे निष्पन्न झाले.

# ‘इंडिया’ आघाडीविरोधातील याचिका सुनावणीस सुप्रीम कोर्टाचा नकार

नवी दिल्ली: देशातील विरोधकांच्या २६ पक्षांनी एकत्र येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला आव्हान दिले आहे. त्यासाठी विरोधकांनी आघाडीला ‘इंडिया’ असे नाव दिले आहे. विरोधकांच्या या आघाडीच्या INDIA या नावाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे. सुप्रीम कोर्टाने या प्रकरणी निवडणूक आयोगाकडे जाण्याचा सल्ला दिला आहे.

याचिकाकर्त्यांच्यावतीने राजकीय नीतिमत्तेवर प्रश्न उपस्थित करताना न्यायालयाने सांगितले की,आम्ही येथे राजकीय पक्षांच्या नीतिमत्तेवर सुनावणी करत नाही. याचिकाकर्त्याने सांगितले की, . विरोधकांच्या या आघाडीच्या नावाविरोधात एक याचिका दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबीत आहे. त्यावर न्यायालयाने याचिकाकर्त्याला सर्वोच्च न्यायालयातून याचिका मागे घेण्याची परवानगी दिली आहे.

विरोधकांनी इंडियाचे (I.N.D.I.A) तुकडे केले, असं म्हणत मोदींनी विरोधकांच्या इंडिया आघाडीवर टीका केली. तर विरोधकांचं 'इंडिया' गठबंधन नाही, तर ते 'घमंडिया' गठबंधन असल्याचंही पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे. विरोधकांनी त्यांच्या आघाडीला ‘इंडिया’ असे नाव दिल्यामुळे कायद्यातील तरतुदींचा भंग झाल्याचा आरोप करत एक याचिका दाखल करण्यात आली होती. आज सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर सुनवाणी करण्यात नकार देत निवडणूक आयोगाकडे जाण्यचा सल्ला दिली आहे,

## त्यांच्या मते....

▣ **न्यायालयाने आदेश देऊन देखील ‘राणा’ दाम्पत्य न्यायालयात गैरहजर, तेंव्हा विशेष न्यायालयाने न्यायव्यवस्था तुम्हाला गम्मत वाटली का? असा केला सवाल.**
–एक बातमी

‘न्यायव्यवस्थेस’ गंमतीचा विषय ठरवित असल्याची परिस्थिती निर्माण केली जात आहे.

▣ **पदभरतीच्या नावावर विद्यार्थ्यांकडून खासगी कंपन्यामार्फत शुल्क वसूल करत निधी उभा केला जात आहे.**
–प्रकाश आंबेडकर

शासकीय नोकर भरती प्रक्रिया हिच मुळात मोफत असली पाहिजे.

▣ **देशात टोमॅटोचा तुटवडा पाहता, नेपाळमधूनही टोमॅटो आयात करण्यात येत आहे.**
– ना. निर्मला सीतारमन

आपला देश ‘कृषीप्रधान’ आहे. माहिती असावी.

▣ **राष्ट्रवादीमध्ये असताना भाजपाच्या नेत्यांची मिमिक्री करणारे आता हर हर मोदी म्हणू लागले आहेत.**
– आ. संदीप क्षीरसागर

राजकारण महानाट्य, इथे संधीनुसार भाषा बदलते.

# राजद्रोह कायदा रद्द करणार

## CrPC दुरुस्ती विधेयक सादर करताना गृहमंत्री अमित शाह यांची मोठी घोषणा



नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत उीझउ दुरुस्ती विधेयक सादर केलं आहे. भारतीय दंड संहिता, सीआरपीसी आणि भारतीय पुरावा कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील तिनही विधेयके आज लोकसभेत सादर करण्यात आली. त्यानंतही ही तिन्ही विधेयके गृहमंत्रालयाच्या स्थायी समितीकडे पाठवण्यात आली आहे. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राजद्रोहाचा कायदा रद्द करण्यात येत असल्याची मोठी घोषणाही केली. दरम्यान, यासंदर्भात सरकारकडून प्रस्ताव मांडण्यात आला होता. गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या या कायद्याबाबत बराच वाद झाला होता, अनेक विरोधी पक्षांनी तो रद्द करण्याची मागणी केली होती आणि त्याचा गैरवापर होत असल्याचा आरोपही केला जात होता.

गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत तिन्ही विधेयके सादर केली आणि त्यानंतर ही तिन्ही विधेयके गृहमंत्रालयाच्या स्थायी समितीकडे पाठवण्यात आली आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, मी जी तीन विधेयके एकत्र आणली आहेत, ती तीन विधेयके फौजदारी कायदा प्रक्रिया, फौजदारी न्याय व्यवस्था सुधारणार आहेत. पहिला भारतीय दंड संहिता (Indian Penal Code) १८६० मध्ये बनवला गेला, दुसरा क्रिमिनल प्रोसिजर कोड (Code of Criminal Procedure) जो १८९८ मध्ये बनवला गेला आणि तिसरा इंडियन इव्हिडेन्स ॲक्ट (Indian Evidence Act) जो १८७२ मध्ये ब्रिटिश संसदेनं मंजूर केला होता. हे तिन्ही कायदे रद्द करून आज तीन नवीन कायदे आणले जाणार आहेत.

गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय सुरक्षा संहिता विधेयक (CrPC) सादर करताना लोकसभेत सांगितलं की, ब्रिटिशांनी बनवलेल्या ३ कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. IPC (भारतीय दंड संहिता) ची जागा भारतीय न्यायिक संहिता २०२३ नं घेतली आहे. तर उीझउ ऐवजी भारतीय नागरी संरक्षण संहिता २०२३ आणि इव्हिडेन्स ॲक्टची जागा भारतीय पुरावा कायदा २०२३ नं घेतली आहे.

अमित शाह म्हणाले की, नव्या सीआरपीसीमध्ये ३५६ विभाग असतील, यापूर्वी ५११ विभाग होते. पुढे बोलताना ते म्हणाले, गुलामगिरीच्या खुणा नष्ट करून नवा कायदा आणण्याचा निर्णय घेतला आहे. लोकांचा कायद्यावरील विश्र्वास उडाला आहे. कारण त्यांना न्याय खूप उशिरा मिळतो. अशातच न्यायालयीन कामकाज आता डिजीटल करणार. संपूर्ण ट्रायल आता व्हिडीओ कॉलद्वारे पूर्ण केली जाईल. पुरावे गोळा करताना व्हिडीओग्राफी करणं अनिवार्य असेल. देशातील संपूर्ण कायदा आणि सुव्यवस्था बदलली जात आहे. ज्या विभागात ७ वर्षांपेक्षा जास्त शिक्षेचं प्रावधान असेल, त्या प्रकरणामध्ये पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक टीम तिथे पोहोचेल.

कायद्यांमधील सुधारणांबाबत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, आता आपली ओळख लपवून किंवा बदलून एखाद्या महिलेसोबत लैंगिक संबंध ठेवणं हा गुन्हा असेल. त्यासाठी शिक्षेचंही प्रावधान असेल. असं पहिल्यांदाच केलं जात आहे.

मार्च २०२० मध्ये मोदी सरकारने ब्रिटिशकालीन गुन्हेगारी कायद्यांसंदर्भात म्हणजे सीआरपीसी (फौजदारी प्रक्रिया संहिता) आयपीसी (भारतीय दंड संहिता) आणि इव्हिडेन्स ॲक्ट (भारतीय पुरावा अधिनियम) यामध्ये कालसुसंगत दुरुस्ती करण्यासाठी गुन्हेगारी कायदे दुरुस्ती समिती स्थापन केली होती. राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे तेव्हाचे कुलगुरु प्रा. डॉ. रणबीर सिंह या समितीचे अध्यक्ष होते. प्रा डॉ रणबीर सिंह यांच्याशिवाय या समितीत राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. जीएस बाजपेयी, तसंच दिल्ली राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा डॉ बलराज चौहान आणि ज्येष्ठ विधीज्ञ महेश जेठमलानी यांचा समावेश होता तसंच दिल्लीचे निवृत्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश जीपी तरेजा यांचाही या समितीत समावेश होता. या समितीने सुचवलेल्या शिफारसींनुसारच ब्रिटीशकालीन गुन्हेगारी कायद्यात सुधारणा करून त्याऐवजी पूर्णपणे भारताच्या सध्याच्या तसंच भविष्यातील गरजेनुसार कायदे करण्यासाठी नवी विधेयके संसदेच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.


मराठी साहित्य विश्वातील थोर कवी-गीतकार व ज्येष्ठ साहित्यिक
ना.धों. महानोर
व
फुले-आंबेडकरी चळवळीतील क्रांतिकारी विचारवंत
प्रा. हरी नरके
श्रध्दांजली सभा
साहित्य व सामाजिक क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे ना.धों. महानोर व फुले- आंबेडकरी विचारवंत प्रा. हरी नरके यांच्या निधनाने सबंध महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या दोहोंप्रती असलेल्या आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी **रविवार दि. 13 ऑगस्ट 2023 रोजी सायं. 4.30 वा.** श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व साहित्य, संस्कृती, समाजकारण, राजकारण व अशा चळवळीतील सर्व मान्यवरांनी या श्रध्दांजली सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.
आयोजक: महाराष्ट्र विकास आघाडी, लातूर
स्थळ: परिवर्तन सभागृह, गोविंदाग्रज सदन, शाम नगर, अंबाजोगाई रोड, लातूर

# इन्स्टाग्राम आणि फेसबुककडून मिळालेले पैसे काढता येत नाहीत? अशा सोप्या मार्गाने काढता येतील पैसे

इन्स्टाग्राम आणि फेसबुकच्या माध्यमातून अनेकांना पैसे मिळत आहेत पण हे पैसे कसे काढायचे ही त्यांची सर्वात मोठी समस्या आहे. दरम्यान तुम्ही पेटीएम, गुगल पे, भीमा ॲपद्वारे फेसबुक आणि इंस्टाग्रामवरून येणारे पैसे काढू शकत नाही. आंतरराष्ट्रीय चलन एकतर थेट तुमच्या बँक खात्यात जमा केले जाऊ शकते किंवा त्यासाठी तुम्हाला वेगळे ॲप वापरावे लागेल. आम्ही तुम्हाला या ॲपबद्दल सांगणार आहोत की तुम्ही हे पैसे कसे काढू शकता आणि कसे वापरू शकता.

जेव्हा तुम्ही ऋलशलेज्ञ किंवा खपींरसीरा मधून पैसे काढणे किंवा पेआउट सेट अप करता तेव्हा तुम्ही झरूझरश्र खात्याचा पर्याय पाहिला असेल. हे पाहून अनेक वापरकर्ते आमच्याकडे नाही असे मानून माघार घेतात. पण हे एक पैशाचे व्यवहार ॲप आहे, या ॲपद्वारे तुम्ही आंतरराष्ट्रीय कमाई सुलभ करू शकता. म्हणजेच, फेसबुक आणि इंस्टाग्रामवर कमाई करण्यासाठी तुम्ही या ॲपचा वापर करून तुमचे खाते त्वरित मिळवू शकता.

यासाठी तुम्हाला कुठेही जाण्याची गरज भासणार नाही, तुम्ही घरबसल्या तुमच्या खात्यात आंतरराष्ट्रीय चलन घेऊ शकाल. जे वापरकर्ते यूएस बाहेर राहतात, ते वापरकर्ते कोणत्याही कार्डशिवाय पैसे घेऊ शकतात.




### कसे सेट करावे फेसबुक पेआउट

तुम्ही इन-स्ट्रीम जाहिराती किंवा सदस्यत्वांसाठी सदस्यत्व घेतले असल्यास, तुम्हाला पेआउट खाते तयार करण्यासाठी सूचना प्राप्त होईल. असे केल्याने जेणेकरून तुम्हाला Facebook आणि Instagram वर कमावलेले पैसे सहज मिळू शकतील. त्याच्या सेटअपसाठी तुम्हाला या स्टेप फॉलो कराव्या लागतील.

यासाठी, सर्वप्रथम, तुम्हाला पेआउट सेटअपवर जावे लागेल आणि तुमचे अधिकृत नाव, पत्ता आणि ईमेल आयडी लिहावा लागेल.

आता तुमच्या व्यवसायाच्या आधारावर करदात्याची माहिती लिहा.

यानंतर, भरण्यास सांगितले जात असलेल्या तपशीलांमध्ये काळजीपूर्वक उत्तर निवडा.

तुम्ही यूएस बाहेरील देश निवडल्यास, तुमचा लागू होणारा परदेशी कर ओळख क्रमांक येथे प्रविष्ट करा.

यानंतर, तुमच्या फोनमध्ये झरूरिश्र ॲप डाउनलोड करा आणि त्यावर खाते तयार करा आणि बँकेशी कनेक्ट करा.

येथे तुम्हाला बँक खाते किंवा झरूझरश्र खात्याचे तपशील विचारले जातात, तुम्ही दोन पर्यायांपैकी कोणताही एक पर्याय निवडू शकता, त्यानंतर मागितल्या जाणाऱ्या माहितीची एक-एक उत्तरे लिहित रहा.

या प्रक्रियेसह, तुम्ही तुमच्या बँक खात्यात खपींरसीरा वरून कमाई देखील मिळवू शकता.

### कधी येतात फेसबुककडून पैसे

१६ तारखेपासून महिनाअखेरीपर्यंत मिळालेली कमाई पुढील महिन्याच्या २१ तारखेच्या आसपास दिली जाते. तुम्हाला ऋलशलेज्ञ वर २५ (जवळपास रु. २,०७०) किंवा १०० (सुमारे रु. ८,२८०) मिळाल्यास, तुम्ही तुमच्या लिंक केलेल्या खात्यावर जमा होतात.

# जेव्हा शरद पवारांनी महाराष्ट्रात पाडले होते पहिल्यांदा सरकार, जाणून घ्या संपूर्ण किस्सा

१९७८ मध्ये शरद पवारांनी महाराष्ट्रात पहिल्यांदा सरकार पाडले होते. त्यानंतर ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC) च्या वसंतदादा पाटील यांच्या सरकारमध्ये उद्योग आणि कामगार मंत्री होते. पाटील यांच्या नेतृत्वावर पवार नाराज होते, त्यांना पुरेशी




सत्ता दिली जात नसल्याचे त्यांना वाटत होते. पाटील हे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस गटाशी खूप जवळचे असल्याचेही त्यांना वाटले, ज्याला पवारांनी विरोध केला.

जुलै १९७८ मध्ये, शरद पवार यांनी इतर ३८ खछउ आमदारांसह पक्षापासून फारकत घेतली आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (समाजवादी) (INC(S) ची स्थापना केली. त्यांनी जनता पक्ष आणि प्रोग्रेसिव्ह डेमोक्रॅटिक फ्रंट (PDF) सोबत सामील झाले. पीझंट्स अँड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया (PWP) सोबत देखील युती केली.

पीडीएफ सरकारने १८ जुलै १९७८ रोजी शपथ घेतली आणि शरद पवार मुख्यमंत्री झाले. तेव्हा वयाच्या ३८ व्या वर्षी ते महाराष्ट्राचे सर्वात तरुण मुख्यमंत्री होते. पीडीएफ सरकार केवळ १८ महिने टिकले. इंदिरा गांधी केंद्रात सत्तेवर परतल्यानंतर फेब्रुवारी १९८० मध्ये महाराष्ट्राच्या राज्यपालांनी ते नाकारले.

शरद पवार यांचा सरकार पाडण्याचा निर्णय ही महाराष्ट्रातील मोठी राजकीय घटना होती. सत्ताधारी पक्षांतर्गत बंडखोरीमुळे सरकार पडण्याची ही पहिलीच वेळ होती. या घटनेने महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवारांच्या सत्तेची नांदीही ठरली.

महाराष्ट्रात सरकार पाडणारे पहिले व्यक्ती म्हणून पवारांचा वारसा संमिश्र आहे. काहीजण त्यांना राजकीय संधीसाधू म्हणून पाहतात, जो सत्तेसाठी आपल्याच पक्षाशी विश्वासघात करण्यास तयार असतो. इतर लोक त्यांना एक दूरदर्शी नेता म्हणून पाहतात, जो सत्ता काबीज करण्यास इच्छुक असतो.

पवारांबद्दल कोणाचेही मत काही असले, तरी ते महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहेत, यात शंका नाही. ते तीन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले आहेत आणि सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (NCP) अध्यक्ष आहेत. ते भारतातील सर्वात शक्तिशाली राजकारण्यांपैकी एक आहेत.

# तुम्हीही कोलंबोला मानता का श्रीलंकेची राजधानी? परीक्षेपूर्वी जाणून घ्या योग्य उत्तर




जर तुम्हाला कोणी श्रीलंकेची राजधानी विचारली, तर तुमच्या तोंडून सहसा फक्त कोलंबो असे उत्तर निघेल. पण, हे पूर्ण सत्य नाही. भारताच्या या शेजारील बेट देशाच्या दोन राजधान्या आहेत. कोलंबो आणि श्री जयवर्धनेपुरा कोट्टे. स्पर्धा परीक्षेत येणारे असे प्रश्न आपल्याला गोंधळात टाकतात. तरुणांना सत्य कळले पाहिजे, म्हणूनच आम्ही तुमच्यासाठी अशी माहिती घेऊन येत आहोत, जेणेकरून परीक्षेत कोणतीही चूक होऊ नये.

सध्या, कोलंबो ही कार्यकारी आणि न्यायपालिकेची राजधानी आहे आणि श्री जयवर्धनेपुरा कोट्टे ही विधिमंडळाची राजधानी आहे. श्रीलंकेतील लोक विधिमंडळाच्या राजधानीला कोट्टे या नावाने संबोधतात. २९ एप्रिल १९८२ रोजी येथे नवीन संसदेचे उद्घाटन झाले. या संसद भवनाला माजी राष्ट्रपती जेआर जयवर्धने यांचे नाव देण्यात आले आहे.

सुमारे १२ एकरांवर बांधलेली ही संसद वास्तुकलेचा अप्रतिम नमुना आहे. गेल्या ४० वर्षांत अनेक सरकारी कार्यालये नव्या राजधानीत पोहोचली असून अनेकांचे स्थलांतर अजूनही सुरू आहे. कोट्टे हे कोलंबोला लागून दक्षिण-पूर्वेस वसलेले आहे. हे शहर खूप जुने आहे. १९३० मध्येच कोट्टे नागरी विकास परिषदेचा दर्जा मिळाला. १९९७ मध्ये, श्री जयवर्धनेपुरा कोट्टे नगर परिषद असे नामकरण करण्यात आले. चंद्र सिल्वा हे पहिले महापौर झाले. २०१२ च्या भारताच्या जनगणनेनुसार, कोट्टेची लोकसंख्या १.०७ लाख होती.

कोट्टेला राजधानी बनवण्याचा उद्देश कोलंबोची लोकसंख्या आणि रहदारीचा ताण कमी करणे हा आहे. कोट्टे हे खूप जुने आणि ऐतिहासिक शहर आहे. १४व्या ते १६व्या शतकापर्यंत ही सिंहली राजांची राजधानी होती. संसद भवन दिवाना ओया तलावात वसलेल्या बेटावर बांधले आहे. देशातील महत्त्वाची शैक्षणिक संस्था असलेले श्री जयवर्धनेपुरा विद्यापीठ कोट्टे शहरातच आहे. त्याची स्थापना १८७३ साली झाली.

भारत सरकारने ऑगस्ट २०२३ मध्ये श्रीलंका युनिक डिजिटल प्रोजेक्टसाठी ४५ कोटी रुपयांची मदत केली आहे. यासाठी सरकारने श्रीलंकेला तांत्रिक सहकार्य देण्याचेही मान्य केले आहे, जेणेकरून भारतासारखी आधार प्रणाली या शेजारी देशात लागू करता येईल. श्रीलंकेतील भारताचे उच्चायुक्त गोपाल बागले यांनी भारताचे ४५ कोटी रुपयांचे योगदान तंत्रज्ञान राज्यमंत्री कनक हेरथ यांना सुपूर्द केले. ही रक्कम प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या १५ टक्के असल्याचे सांगण्यात आले आहे. शेजारी देश प्रथम या तत्त्वावर भारताने ही आर्थिक मदत दिली आहे.


या प्रकल्पाद्वारे, श्रीलंका सरकारचा देशातील प्रत्येक नागरिकाच्या बुबुळ, बोटांचे ठसे आणि इतर महत्त्वाची माहिती संकलित आणि डिजिटल करण्याचा मानस आहे. आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेने ठरवून दिलेल्या मानकांचीही काळजी घेतली जात आहे, जेणेकरून श्रीलंकेच्या कोणत्याही नागरिकाला परदेशात प्रवास करताना ओळखीशी संबंधित कोणत्याही समस्येचा सामना करावा लागू नये. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देशातील नागरिकांसाठी सरकारी सुविधा आणि कल्याणकारी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत सुलभता येणार आहे. भ्रष्टाचार थांबण्यास मदत होईल. प्रत्येक गरजूला त्याचा हक्क देण्याची सोय होईल. भारताप्रमाणेच श्रीलंका सरकार याला बँकिंग आणि इतर आर्थिक माध्यमांशी जोडण्याच्या योजनेवर काम करत आहे.

गेल्या वर्षी म्हणजेच मार्च २०२२ मध्ये या प्रकल्पासाठी दोन्ही देशांमध्ये करार झाला होता. या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने भारत-श्रीलंका संयुक्त प्रकल्प देखरेख समितीही त्याच वेळी स्थापन करण्यात आली. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटपासून ते इतर प्रशासकीय मदतीसाठी सज्ज राहण्याची जबाबदारी या समितीची आहे. या करारानुसार आता आर्थिक मदतही पोहोचली आहे.

# फेसबुक मेसेंजर वापरणाऱ्यांना धक्का, पुढील महिन्यापासून बंद होणार हे फीचर

फेसबुक असो किंवा फेसबुक मेसेंजर, या दोन्ही ॲप्सचे दररोज लाखो ॲक्टिव्ह यूजर्स आहेत, अशा परिस्थितीत आता कंपनी फेसबुक मेसेंजरवरून एक फीचर काढून टाकणार आहे, ज्यामुळे यूजर्सना मोठा धक्का बसणार आहे. २०१६ मध्ये, मेटा ने Android स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी एसएमएस एकत्रीकरण वैशिष्ट्य प्रदान करण्यास सुरुवात केली होती आणि आता सुमारे सात वर्षांनी म्हणजे २०२३ मध्ये, हे वैशिष्ट्य बंद केले जात आहे. म्हणजेच फेसबुक मेसेंजरवरून एसएमएस सपोर्ट फीचर लवकरच बंद होणार आहे.

मेटाने माहिती दिली आहे की, हे फीचर २८ सप्टेंबर २०२३ पासून बंद केले जाईल, म्हणजेच यानंतर मेसेंजरमध्ये आलेला एसएमएस



पाहता येणार नाही. सध्या याच ॲपमध्ये यूजर्स फेसबुकवर आलेले मेसेज आणि एसएमएसमध्ये आलेले मेसेज ॲपमध्ये पाहू शकतात. मेसेंजरमध्ये एसएमएस आता जांभळ्या रंगात दिसतात आणि फेसबुकवरील मित्रांचे संदेश मेसेंजरमध्ये निळ्या रंगात दिसतात.

Meta ने दिलेल्या माहितीनुसार, २८ सप्टेंबर नंतर, Android स्मार्टफोन वापरणारे वापरकर्ते सेल्युलर नेटवर्कद्वारे एसएमएस पाठवण्याची आणि प्राप्त करण्याच्या सुविधेचा आनंद घेऊ शकणार नाहीत. याचा अर्थ डचड साठी तुम्हाला फक्त फोनचे डिफॉल्ट मेसेजिंग ॲप वापरावे लागेल.

मेटाने हे देखील स्पष्ट केले आहे की जर एखाद्या वापरकर्त्याने नवीन डीफॉल्ट मेसेजिंग ॲप निवडले नाही, तर एसएमएस स्वयंचलितपणे त्रेस्रश्रश संदेश ॲपमध्ये सेव्ह होईल. बंद केल्यानंतर, हे २ पर्याय वापरकर्त्यांसमोर सोडले जातील.

फेसबुक मेसेंजरद्वारे हे वैशिष्ट्य बंद केल्यानंतर, तुमच्याकडे फक्त दोन पर्याय शिल्लक राहतील, प्रथम तुम्ही त्रेस्रश्रश संदेश सारख्या दुसऱ्या ॲपवर स्विच करा किंवा फोनसोबत येणारा डीफॉल्ट एसएमएस निवडा.

Apple iMessage आणि Google Android Message वैशिष्ट्याशी स्पर्धा करण्यासाठी Facebook ने २०१६ मध्ये SMS इंटिग्रेशन फीचर लाँच केले. हे फीचर सुरू केल्यानंतर यूजर्स फेसबुक फ्रेंड्स आणि एसएमएस एकाच ॲपमध्ये पाहू शकतात.

# रस्त्यातच संपले पेट्रोल, तर मिळते का ऑनलाइन डिलिव्हरी?

आजकाल ऑनलाइन शॉपिंगवर जास्त भर आहे. खाद्यपदार्थ किंवा इतर कोणत्याही वस्तूची ऑर्डर असो, प्रत्येकजण Zomato-Swiggy आणि Amazon-Flipkart कडे धावतो. ऑनलाइन वितरण ही तंत्रज्ञानाच्या जगात मोठी क्रांती आहे. तुम्हाला फक्त फोन उचलायचा आहे आणि ऑनलाइन ऑर्डर बुक करायची आहे. तथापि, कारचे इंधन रस्त्यातच संपल्यानंतर प्रकरण आणखीनच बिघडते. सर्व काही ऑनलाइन उपलब्ध आहे, तर मग पेट्रोल आणि डिझेल देखील ऑनलाईन मिळते का?

हा एक प्रश्न आहे, ज्याचे उत्तर प्रत्येकाला जाणून घ्यायचे आहे. प्रवासादरम्यान वाहनाचे इंधन संपल्याने त्रास वाढतो. पेट्रोल पंप दूर असेल, तर जास्त त्रास होतो. या सर्व गोष्टी टाळण्यासाठी आपण पेट्रोल-डिझेल बुक करू शकतो का? या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

### डोअर स्टेप इंधन वितरण

भारतात अशा अनेक कंपन्या आहेत ज्या घरोघरी इंधन पुरवतात. जर तुमच्या वाहनातील तेल रस्त्याच्या मधोमध संपले, तर डिलिव्हरी करणे कठीण होते. होय, कारण इंधन व्यावसायिक कारणासाठी वितरित केले जाते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तुम्ही पेट्रोल बुक करू शकता असा विचार करत असाल, तर कदाचित तसे नाही.

### फक्त यांना मिळेल लाभ

तंत्रज्ञानाची गरज ओळखून पेट्रोलियम मंत्रालयाने घरोघरी इंधन वितरणाला परवानगी दिली होती. तथापि, ही सेवा वाहतूक,




उत्पादन, मॉल, रुग्णालय इत्यादींसाठी आहे. इंधन वितरण कंपन्या त्यांच्या सेवा काही विशिष्ट क्षेत्रांनाच पुरवतात. बहुतेक प्रकरणांमध्ये, किमान २०० लिटर इंधनाचे बुकिंग घेतले जाते.

### या कंपन्या करतात इंधन वितरण

इंडियन ऑइलच्या FuelCall godo{edm`, FuelBuddy, Humsafar, Repos Energy, PepFuels, The Fuel Delivery सारख्या कंपन्या इंधन ऑनलाइन डिलिव्हरी करतात. त्यांच्या ॲपवर जाऊन ऑर्डर बुक केली जाते, त्यानंतर डिलिव्हरी मिळते.

तथापि, रेडी असिस्ट आणि रेस्क्यू सारख्या रोडसाइड सहाय्यक कंपन्या तुमच्या वाहनासाठी तेल वितरीत करण्याचा दावा करतात. २ लिटरपासून ते ५ लिटरपर्यंत पेट्रोल-डिझेल ऑर्डर केल्यावर पुरवतो, असे त्यांचे म्हणणे आहे.

# वीरांच्या बलिदानाची कृतज्ञता मेरी माटी मेरा देश

वाचक मित्रांनो गेल्या दहा दिवसांपासून आपण विविध वृत्तपत्र, टीव्हीवर तसेच सोशल मीडियावर माझी माती माझा देश किंवा मेरी माटी मेरा देश या अभियानाबाबत बातम्या आणि सोशल मीडिया ट्रेण्ड बघत आहोत. हा अभियान कशासाठी राबविला जात आहे याबाबत आपल्याला नक्कीच उत्सुकता असेल तर चला जाणूया मेरी माटी मेरा देश या अभियान बाबत थोडक्यात...

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी प्राणपणाने लढणाऱ्या केंद्रीय संरक्षण दलातील भारतीय सैनिक व पोलीसांना वंदन करण्यासाठी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे समारोप वर्ष मेरी माटी मेरा देश या अभियानाच्या माध्यमातून साजरे करण्यात येत आहे. देशासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक,वीर सैनिक,पोलीसांच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मेरी माटी मेरा देश हे अभियान राबविण्यात येत आहे.

हे अभियान देशभर देशाप्रती अभिमान बाळगून राबविण्यात येत आहे.या अभियानाअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्वातंत्र्य सैनिक, भारतीय जवान व ज्या पोलीसांनी देशाच्या स्वातंत्र्य लढयात व देशाच्या सुरक्षेसाठी आपल्या प्राणाची आहुती दिली, त्यांचे हे स्मारक शिलाफलक लावण्यात येणार आहे.त्यामुळे देशासाठी हौतात्म पत्करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक व भारतीय जवान यांच्या कार्याची ओळख होवून प्रत्येक भारतीयाला प्रेरणा मिळणार आहे. शिलाफलकाच्या उभारणीसाठी गावातील संस्मरणीय असलेल्या अशा एका ठिकाणाची निवड करण्यात येणार आहे.अमृत सरोवर/ शाळा/ ग्रामपंचायत या ठिकाणी शिलाफलकाची उभारणी करण्यात येणार आहे. शिलाफलकाचे बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायत ठराव घेवून त्याची उभारणी ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून करण्यात येणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये उभारण्यात येणाऱ्या शिलाफलकाचा आकार हा निश्चित ठरविण्यात आला आहे. ग्रामपंचायतमार्फत उभारण्यात येणाऱ्या शिलाफलकाचा सांभाळ करण्याची जबाबदारी ही संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात येणार आहे.ज्या गावामध्ये हुतात्म्यांची नावे उपलब्ध नाही तेथे शिलाफलकाच्या डाव्या भागात अमृत महोत्सवाचे बोधचिन्ह, ग्रामपंचायत किवा शहराचे नांव व तारीख नमुद करण्यात येईल. मध्यभागी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जीवनाचा प्रत्येक दिवस, प्रत्येक क्षण आणि प्रत्येक श्वास, मातृभूमिसाठी जगणे हीच स्वातंत्र्य सैनिकांना आपली खरी आदरांजली असेल. हा संदेश आणि स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आणि मातृभूमीच्या अभिमानासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.अशा थोर विभुतींना विनम्र अभिवादन हे वाक्य त्यावर असेल.

९ ऑगस्ट रोजी पंचप्रण प्रतिज्ञा घेतली. ही प्रतिज्ञा घेतांना हातात माती घेवून, मातीची दिवे घेवून ग्रामपंचायतस्तरावर सर्व अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी व गावकऱ्यांना घेवून शेल्फी काढली. त्यानंतर ही शेल्फी https://yuva.gov.in/ merišmaatiš merašdesh यावर अपलोड करुन राष्ट्र उभारणीसाठी वचनबध्द होण्यासाठी ही पंचप्रण शपथ घेतली आहे.पंचप्रण शपथमध्ये मी अशी शपथ घेतो की,भारताला २०४७ पर्यंत विकसित देश बनविण्याचे स्वप्न साकार करायचे आहे.गुलामगिरीची मानसिकता मुळापासून उखडून टाकायची आहे, देशाच्या समृद्ध वारसाचा अभिमान सदैव बाळगण्याच आहे.एकता व एकजूटता यासाठी कर्तव्यदक्ष राहायचं आहे,नागरिकांचे कर्तव्य बजावायाचे आहे,देशाचे रक्षण करणाऱ्यांचा कायम आदर ठेवायचा आहे.

वसुधा वंदनच्या माध्यमातून प्रत्येक गावात दिर्घकाळ टिकणाऱ्या ७५ स्वदेशी रोपांची लागवड करुन पृथ्वी मातेचे नुतनीकरण व भरभराट करण्यासाठी गावातील योग्य ठिकाण निवडून शक्यतो शिलाफलकाजवळ वंदन म्हणून ७५ देशी रोपांची लागवड करुन अमृत वाटीका तयार करण्यात येणार आहे.यासाठी सामाजिक वनीकरण विभागाची रोप वाटीका किंवा हर घर नर्सरीमधील रोपांचा वापर करण्यात येणार आहे.या रोपांचे जतन व उभारणी करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीचे काम रोजगार सेवक/ग्रामपंचायत कर्मचारी याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे.

१५ ऑगस्ट रोजी ज्यांनी निस्वार्थपणे देशाची सेवा करून देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले. अशा विरांना वंदन करण्यासाठी त्यांच्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक, सेवानिवृत्त संरक्षण कर्मचारी, केंद्रीय शस्त्र पोलीस दलाचे कर्मचारी,राज्य पोलीस दलाचे कर्मचारी आणि स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे कुटूंबाचा सन्मान करण्यात येणार आहे.

१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात येणार आहे. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२३ रोजी मागील वर्षीप्रमाणे यावर्षी प्रत्येक घरोघरी तिरंगा या अभियानाचे योग्य ते नियोजन करुन हर घर तिरंगा फडकविण्यात येणार आहे. हर घर तिरंगा २.० मोहिमेअंतर्गत सर्व नागरीकांना घरोघरी राष्ट्रध्वज फडकविण्यात सहभागी होण्यासाठी नागरीकांनी गेल्या वर्षीचे सुस्थितीत शिल्लक असलेले राष्ट्रध्वज वापरावे. तसेच ग्रामपंचायतीकडे जमा असलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास राष्ट्रध्वज विविध ठिकाणी असलेल्या ध्वजविक्री केंद्रातून खरेदी करण्यात येणार आहे. हर घर तिरंगा अभियानामध्ये शक्यतो घरोघरी महिला,सुन,माता व मुली यांच्या हस्ते ध्वजवंदन करावे.

९ ऑगस्ट रोजी विद्यार्थी, शेतकरी व महिला यांच्यामार्फत शेतातील मुठभर माती जमा करण्यात आली. जमा केलेली माती १ लिटर आकाराच्या तांब्याच्या कलशामध्ये एकत्रित करुन शिलाफलकजवळ कलश पूजन करण्यात आले. सायंकाळी हुतात्म्याच्या स्मृतीनिमित्त होणाऱ्या अभिवादन कार्यक्रमात कलश सन्मानपूर्वक ठेवण्यात आले. १० ऑगस्ट रोजी कलश सन्मानपूर्वक पंचायत समितीस्तरावरील समन्वयक अधिकारी यांच्याकडे सोपवण्यात आला. पंचायत समितीस्तरावर प्रत्येक गावातील आणलेली माती ५ लिटर आकाराच्या तांब्याच्या २ कलशामध्ये गोळा करून . या कलशावर तालुका, जिल्हा व राज्याचे नांव पेंट करुन हा मातीचा कलश १२ ऑगस्ट रोजी जिल्हा कक्षाकडे युवकामार्फत पाठविला जाईल.

कार्यक्रमात काढण्यात आलेले सेल्फी फोटो अपलोड करण्याकरीता https:// merimaatimeradesh.gov.in या संकेतस्थळावर जावे. त्यानंतर बाजूचे होमपेज दिसेल. वैयक्तिक शेल्फी फोटो अपलोड करावयाचे असल्यास प्रतिज्ञा ले वर क्लिक करुन पुढील येणाऱ्या पेजवर आपले नांव, मोबाईल क्रमांक, राज्य व जिल्हा प्रविष्ठ करावा. व त्यानंतर पुढील पेजवर काढलेला फोटो/सेल्फी अपलोड करावा.माहिती सबमीट केल्यानंतर आपले प्रमाणपत्र प्राप्त होईल.

९ ते ३० ऑगस्टदरम्यान मेरी माटी मेरा देश या अभियानात गाव आणि गटस्तरावर स्थानिक शहरी संस्था तसेच राज्य आणि राष्ट्रीयस्तरावरील कार्यक्रमांचा समावेश राहणार आहे.दिल्लीत अमृत वाटीका तयार करण्यासाठी देशाच्या विविध भागातून ७५०० कलशांमध्ये माती घेवून अमृत कलश यात्रा काढण्यात येणार आहे. ही अमृत वाटीका एक भारत श्रेष्ठ भारत या वचनबध्दतेचे प्रतिक असणार आहे. या अभियानातील विविध उपक्रमांची संबंधित माहिती नसणारे तरुण या संकेतस्थळावर सेल्फी आणि रोपे लावण्यासाठी उपक्रम अपलोड करुन https:// yuva.gov.in/ merišmaatišmerašdesh या पोर्टलव्दारे मोहिमेत सामिल होवू शकतात. 'मेटी माटी मेरा देश' या अभियानात प्रत्येकाने सहभागी होवून देशासाठी प्राणपणाने लढणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक,भारतीय जवान पोलिस यांना श्रध्दांजली देण्यासाठी व त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मेरी माटी मेरा देश हे अभियान राबविण्यात येत आहे.

**-यासेरोद्दीन काझी**
माहिती अधिकारी, उस्मानाबाद

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770




# केळीच्या नामशेष होणाऱ्या प्रजातीचा पुनर्विकास, आता शेतकऱ्यांची लाखोंची कमाई होणार



केळी आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. हे तुम्हा सर्वांना माहीत आहे. पण तुम्हाला माहीत आहे का की, देशातील शेतकरी बांधवांना केळीच्या शेतीतून अनेक पटींनी फायदे मिळतात. गेल्या काही वर्षांपासून केळी लागवडीतून शेतकऱ्यांना फारसा फायदा होत नसल्याचे चित्र आहे. याचे मुख्य कारण हवामान आणि इतर अनेक कारणे दिली जात आहेत. धोकादायक रोगांमुळे आता केळीच्या काही प्रजाती हळूहळू नष्ट होत असल्याचेही दिसून आले आहे.

परंतु नामशेष झालेल्या प्रजातींचा पुनर्विकास करण्यासाठी शास्त्रज्ञ सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. या मालिकेत बिहारमधील शास्त्रज्ञही पुढे आले आहेत, ज्यांनी केळीच्या नामशेष होत असलेल्या प्रजातींचा पुनर्विकास करण्याचे काम केले आहे, ज्यांनी राज्याची ओळख गमावली होती.चिनिया आणि मलभोग केळी राज्यात बराच काळ नामशेष झाली होती. आणि आता बिहारच्या शास्त्रज्ञांनी ते पुन्हा उघडले आहे. वास्तविक, हे केळे खायला चविष्ट असून अनेक औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. लोकही मोठ्या आवडीने खातात.

शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, राज्यात पूर्वी ८० टक्क्यांपर्यंत ही केळी शेती शेतकरी करत होते. पण हळुहळु चिनिया आणि मालभोग केळीची ओळख हरवली. आता त्याच शास्त्रज्ञांनी या प्रजातीचा पुनर्विकास केला आहे. जेणेकरून लोकांना ते पुन्हा सेवन करण्याची संधी मिळेल. बिहारमध्ये केळी चिनिया आणि मालभोगच्या प्रजाती त्याप्रमाणे नाहीशा झाल्या नाहीत. त्याच्या नामशेष होण्याचे कारण पनामा बिलेट नावाच्या आजाराला कारणीभूत आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की सुमारे ३० वर्षांपूर्वी, इतकी चांगली खते उपलब्ध नव्हती.

ज्यामुळे हा रोग बरा होऊ शकेल. मात्र तरीही शेतकरी बांधवांनी केळीची ही प्रजाती वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. तरीही उपयोग झाला नाही. शेतकरी पराभूत झाले आणि त्यांना त्यांच्या शेतात इतर प्रजाती लावाव्या लागल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, बिहार कृषी विद्यापीठाने (कृषी विद्यापीठ) टिश्यू कल्चरच्या मदतीने चिनिया आणि मालभोग केळीच्या प्रजातींचा सबूर यांनी पुनर्जन्म केला आहे. यादरम्यान शास्त्रज्ञांनी अनेक चाचण्या केल्या. यानंतर शास्त्रज्ञांनी या केळी जातीचे रोप जमिनीत लावले. त्यानंतर १३ ते १५ महिन्यांनी या झाडाला फळे येऊ लागली.

# लवंगाची शेती आहे खूपच फायदेशीर, जाणून घ्या...





लवंगाची शेती, जी मुख्यतः पूजेत वापरली जाते, शेतकऱ्यांसाठी फायदेशीर व्यवहार ठरू शकते. देशभरात याला खूप मागणी आहे, पूजेबरोबरच त्याचा खाण्यातही उपयोग होतो. देशात लवंगांना खूप मागणी आहे. याशिवाय त्याची विक्रीही उत्तम दराने होते. लवंगाची लागवड करून शेतकरी बांधव कसे चांगले उत्पन्न मिळवू शकतात ते जाणून घेऊया.

हिवाळ्यात लवंग खाल्ल्याने सर्दी, सर्दी, डोकेदुखी यांसारख्या समस्यांपासून आराम मिळतो. त्याचबरोबर लवंगीपासून बनवलेली टूथपेस्ट आता बाजारात आली आहे. लवंगापासून अनेक प्रकारची आयुर्वेदिक औषधे बनवली जातात. याशिवाय लवंगापासून सौंदर्य उत्पादनेही बनवली जात आहेत. लवंग उष्ण हवामान असलेल्या भागात घेतले जाते.

बकव्हीट झाडे ३० ते ३५ अंश तापमानात वेगाने वाढतात. म्हणूनच महाराष्ट्रातील कोकण भागात ते जास्त घेतले जाते. लवंगाचे रोप लावायचे असेल तर त्याच्या बिया एक दिवस आधी पाण्यात भिजवाव्यात. नंतर बियांच्या वरची साल काढून बिया पेरल्या जातात. पेरणीचे अंतर १० सें.मी. यासोबतच शेतात नेहमी सेंद्रिय खतांचाच वापर करावा.

भारतात अनेक शतकांपासून मसाल्यांची लागवड सुरू आहे. इथल्या मसाल्यांची चव सगळ्या जगाच्या जिभेवर चढली आहे. यामुळेच आज भारत मसाल्यांचा मोठा निर्यातदार बनला आहे. भारतीय मसाल्यांना इतर देशांमध्ये मोठी मागणी आहे. यामुळेच मसाले उत्पादक शेतकरी प्रत्येक संभाव्य युक्ती वापरून चांगल्या दर्जाच्या मसाल्यांची लागवड करतात. यातील अनेक मसाले असे देखील आहेत की, पेरणी आणि लावणी एकदाच केल्यावर त्यांचा अनेक दशके शेतकऱ्यांना फायदा होतो.

यामध्ये लवंगांचा समावेश आहे, ज्याचा वापर मसाले आणि औषधे म्हणून केला जातो. भारतातील कोकणात लवंगाची लागवड (Planting cloves) मोठ्या प्रमाणात केली जाते. याचा उपयोग आयुर्वेदिक औषध बनवण्यासाठी तसेच लवंग पेनकिलर आणि लवंग पेनकिलर औषधे बनवण्यासाठी केला जातो.

पाच वर्षांनी लवंगाची फळे रोपावर येऊ लागतात. लवंग द्राक्षांप्रमाणे गुच्छांमध्ये वाढतात. त्याचा रंग लाल आणि गुलाबी आहे. फुलांच्या आधी कापणी केली जाते. एका झाडापासून २ ते ३ किलोपर्यंत लवंगा तयार होतात. जर शेतकरी बांधवाने आपल्या शेतात सुमारे ५० रोपे लावली तर त्याला १.५० लाख ते १.८० लाख रुपयांपर्यंतचा नफा मिळू शकतो.

# शेतकऱ्यांनो जमिनीची सुपीकता कशी वाढवावी?



जमिनी माती परीक्षणानुसार सल्फर अथवा जिप्समचा वापर, भूमिगत निचरा पद्धती, हिरवळीची खते इत्यार्दीचा वापर करून सुधारता येतात. बिघडलेल्या जमिनीचा तिसरा प्रकार हा चोपण जमिनीच्या रुपाने ओळखला जातो. या जमिनीमध्ये विरघळलेल्या क्षाराचे प्रमाण मर्यादित परंतु मातीच्या कणावर सोडीयमचे प्रमाण जास्त असल्याने जमिनीच्या पृष्ठभागावर कडक पापुद्रे तयार होऊन बियाण्याची उगवण क्षमता कमी होते.

संरचना अतिशय कडक होते. या जमिनी अतिशय विम्लधर्मीय (सामू८.५ पेक्षा जास्त) असून पावसाळ्यात चिबड तर उन्हाळ्यात अतिशय कठीण होतात. या चोपण जमिनी सुधारविण्यासाठी जिप्समचा शेणखतातून वापर केल्यास मातीच्या कणांवर कॅल्शियम येतो व सोडियम सल्फेट निच-याद्वारे निघून जातो. अशा पद्धतीने जिप्समचा शेणखताबरोबर वापर केल्यास चोपण जमिनी सुधारविता येतात.

या चोपण जमिनीत चुनखडीचे प्रमाण जास्त असते अशा जमिनीमध्ये जिप्समऐवजी सल्फरचा वापर करावा. भविष्यातील शाश्र्वत उत्पादनासाठी जमिनीचे आरोग्य व्यवस्थापनात खालील गोष्टींचा अवलंब करणे गरजेचे आहे. पिकांची फेरपालट करून कडधान्य पिकांचा समावेश केल्याने पालापाचोळा जमिनीत पडून सेंद्रिय पदार्थाचे चक्रीकरण होते. तसेच सेंद्रिय खते जसे जमिनीतून द्यावे.

माती परिक्षणाद्वारे कमतरतेनुसार सूक्ष्मअन्नद्रव्यांचा वापर जमिनीतून सेंद्रिय खतात मिसळून करावा. माती परीक्षण करून विद्राव्य खतांद्वारे ठिबक सिंचनातून अन्नद्रव्ये पीक वाढीच्या अवस्थेत गरजेनुसार द्यावीत. पाण्याचा अमर्याद वापर न करता, बागायत क्षेत्रामध्ये ठिबक, तुषार, मायक्रोस्प्रिंकलर पद्धतीचा वापर वाढवावा.

मृद व जलसंधारणाची उपाययोजना लोक सहभागातून कोरडवाहू भागात शासनाच्या मदतीने वाढविणे गरजेचे आहे, कारण पावसाचा प्रत्येक थेंब हा जमिनीत मुरविला गेला पाहिजे. शेततळी तयार करून संरक्षित पाण्याचा उपयोग करावा. बागायत क्षेत्रात दोन ते तीन वर्षातून एकदा तरी हिरवळीची पिके म्हणून धंचा किंवा ताग गाड़ला गेला पाहिजे.

क्षारपड जमिनीचे क्षेत्र सुधारविण्यासाठी एकात्मिक पद्धतीने पाणलोट क्षेत्रात जिप्सम शेणखतात मिसळून जमिनीत टाकावे. जादा पाण्याचा पश्र्चिम महाराष्ट्रातील हलक्या जमिनीचे क्षेत्र ठिबक सिंचनावर आणून कोरडवाहू फळबाग लागवड करणे गरजेचे आहे. जास्त पाणी कमी क्षेत्रावर देण्याऐवजी कमी पाणी जास्त क्षेत्रावर विभागून दिल्यास जमिनी खराब होणार नाहीत तसेच उत्पादनात वाढ होईल आणि सामाजिक समतोल राखला जाईल.

# शेतकऱ्यांनो शिमला मिरची शेती करणार असाल तर जाणून घ्या रोग आणि प्रतिबंधात्मक उपाय

सिमला मिरची ही भारतातील खास भाज्यांपैकी एक आहे. त्याची लागवड शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने खूप फायदेशीर ठरू शकते. सिमला मिरची ही बहुमुखी आणि उच्च मूल्याची भाजी आहे. ज्याला स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे. सिमला मिरची लागवडीसाठी ऑगस्ट महिना सर्वात खास मानला जातो. कारण या महिन्यात पावसामुळे पाण्याची समस्या नाही. या महिन्यात कोणत्याही पिकाच्या झपाट्याने वाढीबरोबरच उत्पादनही चांगले होते. जर तुम्हीही शिमला मिरचीची लागवड करण्याचा विचार करत असाल तर या कथेद्वारे तुम्हाला त्यापासून होणारे आजार आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय जाणून घेता येतील.

### सिमला मिरचीचे रोग

जिवाणूजन्य पानांचे ठिपके: या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असलेले लहान, पाण्यात भिजलेले ठिपके दिसतात, जे नंतर तपकिरी किंवा काळे होतात. हे टाळण्यासाठी रोग प्रतिकारक वाणांचा वापर करावा. वरून झाडांना पाणी द्या जेणेकरून पाणी पानांवर पडणार नाही. जमिनीत रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत रहा.

फायटोफथोरा ब्लाइट: हे देठ आणि फळांवर खोल पाण्यात भिजलेले जखम दाखवते. याच्या प्रभावामुळे पाने कोमेजून कुजण्याची लक्षणे दिसू शकतात. हे टाळण्यासाठी पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नका. पानांवर जास्त पाणी देणे आणि सिंचन टाळा. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाका. ज्यामध्ये, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशक वापरा.

व्हर्टिसिलियम विल्ट: पाने पिवळी आणि कोमेजतात. काही प्रकरणांमध्ये पाने पूर्णपणे मरतात. हे टाळण्यासाठी प्रमाणित रोगमुक्त बियाणे व रोपे वापरावीत. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करा आणि जास्त सिंचन टाळा. जमिनीत रोगजनकांचा जमाव कमी करण्यासाठी पिके फिरवा. या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नाहीत, त्यामुळे प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष केंद्रित केले जाते.

### पावडर बुरशी

यामध्ये पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके दिसतात. हे टाळण्यासाठी, हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवा. झाडांभोवती ओलावा कमी करण्यासाठी ओव्हरहेड पाणी देणे टाळा. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरा.



ऑगस्टमध्ये पावसाचा अंदाज कसा असणार? पुढील दोन आठवड्यांसाठी पावसाचा अंदाज आला समोर, जाणून घ्या...

### ॲफिडचा प्रादुर्भाव

ऍफिड हे लहान आणि मऊ शरीराचे कीटक आहेत जे वनस्पतींमधून रस शोषतात. यामुळे वाढ खुंटते आणि पाने विकृत होतात. हे टाळण्यासाठी, लेडीबग्स आणि लेसविंग्स सारख्या नैसर्गिक भक्षकांना प्रोत्साहन द्या. ऍफिड लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कीटकनाशक किंवा कडुलिंबाच्या तेलाचा वापर करा. वनस्पतींभोवती ॲल्युमिनियम फॉइल ॲफिड्सला प्रतिबंध करू शकते.

येथे लक्षात घेण्याजोगा मुद्दा असा आहे की जेव्हा वनस्पती रोगांचे व्यवस्थापन करण्याचा विचार येतो तेव्हा उपचारापेक्षा प्रतिबंध नेहमीच चांगला असतो. कोणतेही पीक रोगांपासून दूर ठेवण्यासाठी, योग्य स्वच्छता राखणे, रोग प्रतिरोधक वाणांचा वापर करणे आणि झाडे निरोगी ठेवण्यासाठी योग्य परिस्थिती प्रदान करणे आवश्यक आहे.


# अंजीराची शेती कशी करावी, किती उत्पन्न मिळेल, जाणून घ्या...

भारतात अंजीर पिकवणे शेतकऱ्यांसाठी खरोखरच महत्त्वाचे आहे कारण ते विकून भरपूर पैसे कमवू शकतात. अंजीर देखील आपल्यासाठी खरोखर चांगले आहे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. अंजीरमध्ये जीवनसत्त्वे आणि फायबरसारख्या अनेक चांगल्या गोष्टी असतात. आपण ते ताजे किंवा वाळलेले खाऊ शकता.

तुम्ही आजारी असाल किंवा काही आरोग्य समस्या असल्यास ते तुम्हाला बरे वाटण्यास मदत करू शकतात. लोक औषध बनवण्यासाठीही त्यांचा वापर करतात. अंजीर उगवणारे महाराष्ट्र हे भारतातील अव्वल राज्य आहे. अंजीर महाराष्ट्रात व्यवसाय म्हणून घेतले जाते आणि ते तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये देखील घेतले जाते.

अंजीराच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. काही चांगल्या जाती खालीलप्रमाणे आहेत, पंजाब अंजीर, पुणे अंजीर, मार्शलीस अंजीर, पुणेरी अंजीर. अंजीर वाढवण्यासाठी, तुम्हाला उबदार, कोरडे हवामान आणि चांगली माती असलेली जागा आवश्यक आहे जी खूप ओली नाही. मातीमध्ये विशिष्ट प्रमाणात आंबटपणा असणे आवश्यक आहे आणि त्यातून पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे. अंजीरांना चांगली वाढ होण्यासाठी आणि भरपूर फळे येण्यासाठी २५ ते ३५ अंश तापमानाची आवश्यकता असते.

फील्ड तयारी : अंजीर पिकवण्यासाठी मोकळी माती लागते. सर्व प्रथम, रोपाचे जुने भाग विशेष मशीनने काढून शेत स्वच्छ करा. नंतर, माती फोडण्यासाठी आणि मोकळी करण्यासाठी दुसरे मशीन वापरा. यानंतर, शेत गुळगुळीत करून सपाट करा. यानंतर, जमिनीत सुमारे ५ मीटर अंतरावर खड्डा खणणे. शेवटी या खड्ड्यांमध्ये अंजिराची झाडे लावा आणि त्यांना थोडे पाणी द्या.




पेरणी आणि बियाणे प्रमाण : अंजिराची झाडे हलवण्याची उत्तम वेळ म्हणजे जुलै आणि ऑगस्टमध्ये पावसाळा. हे करण्यासाठी, आपण एकतर रोपे वाढवण्यासाठी स्वतःची जागा बनवू शकता किंवा त्यांची विक्री करणार्या स्टोअरमधून काही खरेदी करू शकता. प्रत्येक मोठ्या क्षेत्रासाठी आपल्याला सुमारे २५० रोपांची आवश्यकता असेल. झाडे एकमेकांपासून ५ मीटर अंतरावर ठेवण्याची खात्री करा.

बोगस बियाणे, खत विकून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या १४ विक्रेत्यांना दणका, सातारा कृषी विभागाकडून परवाने निलंबित

वनस्पती सिंचन : जेव्हा आपण अंजीर पिकवतो तेव्हा आपल्याला हंगामानुसार वेगवेगळ्या वेळी पाणी द्यावे लागते. जर आपण त्यांना पावसाळ्यात लावले, जे सहसा जुलै आणि ऑगस्टमध्ये असते, तर आपल्याला त्यांना पावसापासून जितके पाणी मिळते तितके पाणी द्यावे लागत नाही. हिवाळ्यात दर १४ ते २० दिवसांनी पाणी द्यावे लागते. उन्हाळ्यात, अंजीरच्या झाडांना भरपूर पाणी लागते, म्हणून आपल्याला आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे लागते. पावसाळ्यात आपल्याला त्यांना पाणी द्यावे लागत नाही, परंतु जर पुरेसा पाऊस पडला नाही तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे लागते.

वनस्पती काळजी : जर तुम्हाला तुमच्या अंजिराच्या झाडांना जास्त फळे द्यायची असतील तर तुम्हाला त्यांची चांगली काळजी घ्यावी लागेल. एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीत रोपे लावल्यानंतर वर्षभरात रोपांची छाटणी करणे. जेव्हा तुम्ही झाडे कापता तेव्हा त्यावर एक मीटर उंचीपर्यंत नवीन फांद्या वाढणार नाहीत याची खात्री करा. तसेच, कोणत्याही लांब फांद्या कापून टाका. हे रोपाला नवीन शाखा वाढण्यास आणि निरोगी होण्यास मदत करेल, ज्यामुळे त्याला अधिक फळे येण्यास मदत होईल. प्रत्येक उन्हाळ्यात तुमची अंजीर फळे येईपर्यंत छाटून टाकावीत.



# डाळींबाची कोण जात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त, जाणून घ्या...

सध्या डाळींब शेतीला चांगले दिवस आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना चार पैसे मिळू लागले आहेत. यासाठी योग्य जात महत्वाची आहे. लागवडीमध्ये उच्च उत्पादनासाठी आपण ज्या जातींची लागवड करतो ते अतिशय महत्त्वाच्या असतात. अशाच डाळिंबांच्या जातीबद्दल जाणून घ्या. १) गणेश: या प्रकारच्या डाळिंबाचे फळ आकाराने खूप मोठी असते. मोठी, साल लाल आणि पिवळ्या रंगाचे मिश्रण असते. बिया मऊ गुलाबी असतात. ही महाराष्ट्रीतील व्यावसायिक शेती आहे. एका झाडापासून सरासरी उत्पादन ८ ते १० किलो असते.

ही जात १९३६ मध्ये विकसित करण्यात आली. १९७० मध्ये त्याचे नाव ॲलन डी वरून बदलून गणेश असे करण्यात आले. या जातीच्या एका फळाचे वजन २०० ते ३०० ग्रॅम असते. गोड, रसाळ आणि जेवणात रुचकर, त्याच्या दाण्यांचा रंग हलका गुलाबी असतो. एका झाडाला ८ ते १२ किलो फळ मिळते.

२) कमान : हे फळ गणेश जाती पेक्षा लहान असून मऊ बिया असलेले गडद लाल आहे.

३) मऊ : बिया गडद लाल आहेत त्यात मुख्यत: गणेश प्रकाराचा समावेश आहे.

४) बहर : सरासरी प्रत्येक फळांचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅम असते.

५) मस्कत : या प्रजातीच्या फळांमध्ये गुलाबी बिया असतात. ज्यांचा वरचा भाग लाल असतो. फळांचे वजन सरासरी ३०० ते ३५० ग्रॅम असते.

६) ज्योतिष : हा प्रकार आयआयएचआर, बेंगलोरने विकसित केला आहे. फळे मोठी, चमकदार रंगाची असतात. आणि बिया जास्त रसाने मऊ असतात.

७) रुबी :हे प्रजाती देखील आयआयएचआरने बंगळुरूमध्ये विकसित केले आहे. साल लालसर तपकिरी असते.आणि हिरव्या रेषा लाल असतात. फळांचे वजन २७० ग्रॅम आहे आणि सरासरी उत्पादन १६ ते १८ टन प्रति हेक्टर आहे.

८) ढोलका : फळे आकाराने खूप मोठी आहेत आणि विशेषत: गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढतात.

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
गुरूवार १० ऑगस्ट २०२३


## UPSC MPSC चे अभ्यासक्रम सुरु होणार : देवेंद्र फडणवीस

मुंबई : खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)ची स्थापना करण्यात आली आहे. संस्थेमार्फत या घटकांच्या उन्नतीसाठी शैक्षणिक योजना, स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच नोकरीसाठी इच्छुक युवकांसाठी यूपीएससी (UPSC) एमपीएससीचे (MPSC) अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संस्थेला यावर्षी १५० कोटी रुपये देणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DCM Devendra Fadnavis) यांनी दिली.

## पोलिसांच्या संगनमताच्या आरोपांची चौकशी करा, सुप्रीम कोर्टाचे निर्देश

नवी दिल्ली : मणिपूर हिंसाचार प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत जारी करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने मणिपूरमधील परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. महिलांवरील गुन्ह्यांवर नाराजी व्यक्त करतानाच, कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा हिंसाचारावर नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरल्याचा ठपका सर्वोच्च न्यायालयाने ठेवला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने अनेक नवीन गोष्टी समोर आल्या आहेत. मणिपूरमधील हिंसाचार करणाऱ्यांसोबत पोलिसांच्या संगनमताच्या आरोपांची चौकशी करण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. श्रेणी, दर्जा, पदाचा विचार न करता गुन्हेगारांशी संगनमत करणाऱ्या पोलिसांवर कारवाई झाली पाहिजे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. याशिवाय, सर्वोच्च न्यायालयाने तपासाच्या संथगतीवर टीका केली आहे.

# अमित शहांवर कारवाई करा, कलावती बांदुरकरांची पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मागणी

यवतमाळ : मणिपूर हिंसाचाराच्या मुद्द्यावरून लोकसभेतील पावसाळी अधिवेशन चांगलेच तापले आहे. गेले तीन दिवस लोकसभेत मणिपूर हिंसाचारावरून विरोधकांनी मोदी सरकारविरोधात दाखल केलेल्या अविश्र्वास प्रस्तावावर चर्चा झाली. या अविश्वास प्रस्तावावर मंगळवारपासून सुरुवात करण्यात आली. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये या प्रस्तावावरून दोन दिवस चर्चा झाली. बुधवारी राहुल गांधी यांनी या प्रस्तावावर भाषण केले. त्यांच्या या भाषणाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून उत्तर देण्यात आले. १५ वर्षाआधी कलावती बांदूरकर यांच्या भेटीचा उल्लेख करीत त्यांचे पुढे काय झाले? असा सवाल करीत अमित शहांनी टीका केली. अमित शहा यांनी कलावतींचा संसदेत विषय काढल्याने त्या पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत.

राहुल गांधी यांनी त्यांच्या घरी जाऊन जेवण केले पण दिले काहीच नाही, असा दावा अमित शहांकडून संसदेत करण्यात आला. पण शहांनी केलेल्या दाव्याची पोलखोल स्वतः कलावती यांच्याकडून करण्यात आली आहे. मला मोदी सरकारच्या काळात काहीही मिळाले नाही, असे थेट कलावती यांच्याकडूनच सांगण्यात आले आहे. त्यानंतर आता त्यांनी अमित शहा यांनी माझ्याविषयी लोकसभेत खोटी माहिती दिल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

या प्रकरणी बोलताना कलावती बांदुरकर म्हणाल्या की, अमित शहा यांनी माझ्याविषयी खोटी माहिती दिली आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्यावर कारवाई करावी. यासंदर्भातील निवेदन कलावती यांनी मारेगावच्या तहसीलदारांच्या मार्फत पंतप्रधान मोदींना पाठवले आहे. यावेळी काँग्रेसचे कार्यकर्ते कलावती यांच्यासोबत निवेदन देण्यासाठी उपस्थित होते. त्यामुळे कलावती यांचे हे निवेदन पंतप्रधान मोदी यांच्यापर्यंत पोहोचते की नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

गुरुवारी अमित शहा यांनी केलेल्या दाव्याबाबत बोलताना कलावती यांनी सांगितले की, मला भाजप सरकारने कुठलीच मदत आजपर्यंत केली नाही. माझ्या घरी २००८ मध्ये काँग्रेसचे राहुल गांधी आले. त्यानंतर घरी वीज नळ जोडणी, रेशन कार्ड, घरकुल आणि ३० लाखांची मुदत ठेव करून देण्यात आली. राहुल गांधी यांनी केलेल्या मदतीवर अजूनही घर सुरू असून भाजपकडून कोणतीही मदत देण्यात आलेली नाही. तर घरात जी गॅस आहे ती पण मी पैशाने विकत घेतली आहे. मोदी सरकारने गॅसही मोफत दिलेली नाही. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील कलावती बांदूरकर कापूस वेचण्याचे काम करतात. २००५ मध्ये त्यांचे पती परशुराम बांदुरकर यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली होती. त्यावेळी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी त्यांना भेट दिली. त्यानंतर त्यांना मदतीचा ओघ देखील सुरू झाला. भारत जोडो यात्रेदरम्यान वाशीम येथे आयोजित बिरसा मुंडा जयंती सोहळ्यात कलावती बांदूरकर यांनी राहुल गांधी यांची भेट घेऊन आभार मानले होते.

एक नेता एका गरीब आई कलावतीच्या घरी जेवणासाठी गेला होता. इथे मागे बसून त्यांनी गरिबीचे तपशीलवार वर्णन केले. नंतर त्यांचे सरकार ६ वर्षे टिकले, मला विचारायचे आहे की त्या कलावतीचे काय झाले? कलावतींना घर, वीज, गॅस, शौचालय, धान्य, आरोग्य देण्याचे काम नरेंद्र मोदींनी केले. त्या आजही मोदींच्या सोबत आहेत. राहुल गांधी यांचे १३ वेळा लाँचिंग झाले आणि ते अयशस्वी ठरले अशी टीका देखील अमित शहांनी केली.

# पदोन्नतीतील आरक्षण बहाल करा

## राज्य मुख्य सचिवांसोबत शिष्टमंडळाची चर्चा



लातूर : मुंबई येथे महाराष्ट्र राज्य काष्ट्राईब कर्मचारी अधिकारी कल्याण महासंघ,पुणे यांच्यामाध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मा .मुख्य सचिव मनोज सौनिक मंत्रालय, मुंबई. यांची भेट घेऊन राज्यातील कर्मचारी व अधिकारी यांच्या पदोन्नतीतील आरक्षण बहाल करणे व अन्य समस्यांबाबत शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा करून निवेदन दिले.

मुख्य सचिव यांनी SC, ST,VJNT यांच्या पदोन्नतीतील आरक्षणा बाबत माझी भूमिका सकारात्मक आहे.मी प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी अश्वासित आहे असे म्हणाले. या निवेदनात पदोन्नतितील आरक्षण घटनेतील तरतुदी नुसार महाराष्ट्र राज्यामध्ये कर्मचारी अधिकारी यांना बहाल करावे, महाराष्ट्र राज्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बिंदू नामावलीनुसार तात्काळ अनुशेष भरती करण्यात यावा , नोकर भरतीचे अधिकार खाजगी कंपनीला देण्यात येऊ नये,सेवानिवृत्त शिक्षकांची भरती न करता सुशिक्षित पात्र बेरोजगार तरूणांना प्राधान्य द्यावे,सातव्या वेतन आयोगाचा महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांचा २ रा व ३ रा हप्ता तात्काळ देण्यात यावा,जुनी पेंशन संदर्भात नेमलेल्या समितीचा कार्यकाळ संपलेला आहे तरी तात्काळ सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, सातव्या वेतन आयोगामधील वेतन त्रुटी दूर करण्यात याव्यात आदी विषयांवर सविस्तर चर्चा करून संबंधित मागण्यांचे निवेदन मुख्य सचिव यांच्याकडे देण्यात आले.

सदरील निवेदनावर राज्याध्यक्ष चंद्रकांत जाधव महासचिव प्रवीण खाडे, लातूर, विभागीय अध्यक्ष जी. टी. होसुरकर, लातूर, जिल्हा अध्यक्ष नागसेन कांबळे, ज्येष्ठ मार्गदर्शक दिलीप जाधव व जिल्हा सचिव किशोर गायकवाड, आरक्षण समितीचे अध्यक्ष रवी कुरील, समिती सदस्य डि. के. सुर्यवंशी, अरविंद भोसले, आर पी ढगे, बळीराम गायकवाड, आर पी हिंगे, प्रवीण सूर्यवंशी, डॉ. विलास गाजरे, विद्यासागर काळे, शांतीलाल लांडगे, दीपक कांबळे, माधव कांबळे, रणजीत लांडगे, रमेश मांदळे, टी एस रणदिवे इ. उपस्थित होते.

# रविवारपासून राज्यात पुन्हा पाऊस-अंदाज

मुंबई : जुलै महिन्यात पावसाने राज्यातील अनेक भागांमध्ये थैमान घातले होते. जोरदार झालेल्या पावसामुळे राज्यातील काही जिल्ह्यात पुरस्थिती निर्माण झाली होती. यामुळे राज्य शासनाने आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि छऊठऋ च्या पथकांमार्फत पुरस्थिती निर्माण झालेल्या भागातील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवले. जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून याची नुकसान भरपाई शासनाने लवकरात लवकर द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे. जुलै महिन्यात थैमान घातलेल्या पावसाने ऑगस्टच्या महिन्याच्या सुरुवातीपासूनच उघडीप घेतली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी उष्णतेच्या झळा बसण्यास पुन्हा सुरुवात झाली आहे. परंतु हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार पुन्हा एकदा राज्यातील अनेत भागांत पावसाचे पुनरागमन होणार आहे.

येत्या १३ ऑगस्टपासून राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार होणार आहे. त्यामुळे कोकणात आणि विदर्भात पावसाची शक्यता आहे. कोकणात अनेक भागांमध्ये मुसळधार तर विदर्भात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आलेली आहे. तर १५ ऑगस्टपासून सर्वदूर पाऊस पडणार आहे. त्यामुळे मान्सूनच्या नवीन पद्धतीनुसार राज्यात कमी वेळेत अधिक पाऊस पडणार असल्याचेही सांगण्यात येत आहे. तर यंदाच्या मान्सूनवर एल निनो या वादळाचा प्रभाव असल्यामुळे पाऊस कमी पडत आहे, असेही हवामान खात्याकडून याआधीच सांगण्यात आले आहे.

# आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून रोहयो अंतर्गत १४ कामासाठी १ कोटी ७० लाख निधी मंजूर

लातूर : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील सात गावातील एकूण १४ कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी ७० लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

महाराष्ट्रात मनरेगा अंतर्गत मागेल त्याला काम या ऐवजी मागेल त्याला काम आणि हवे ते काम या ध्येयाने कार्यरत असलेल्या महायुती शासनाच्या रोहयो नियोजन विभागाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ७ गावात १४ कामांना मान्यता दिली असून यासाठी १ कोटी ७० लाख निधी मंजूर केला आहे. सदरील मंजूर निधीतून त्या त्या गावात पेवर ब्लॉक रस्त्याची कामे करण्यात येणार आहेत.

भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे रोहयो मंत्री ना. संदिपान भुमरे यांच्यासह सर्व संबंधिताकडे पाठपुरावा केल्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघात रेणापूर तालुक्यातील रामवाडी (पा) २० लक्ष रुपये, लातूर तालुक्यातील करकट्टा २० लक्ष, वांजरखेडा तीन कामे ३० लक्ष, भातांगळी १० लक्ष, मुरुड येथे चार कामे ५० लक्ष रुपये आणि औसा तालुक्यातील भादा सर्कलमधील उटी बु. तीन कामे ३० लक्ष रुपये, शिंदाळा १० लक्ष रुपये याप्रमाणे एक कोटी ७० लाख रुपये खर्चाच्या पेव्हर ब्लॉकच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. सदरील कामाला मंजुरी मिळवून दिल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांसह नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

# सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी ऑनलाईन माहिती सादर करण्याचे आवाहन

## नोव्हेंबर, फेब्रुवारीच्या वेतन देयकासोबत प्रमाणपत्र जोडावे लागणार

लातूर : नियोजन विभागामार्फत शासकीय सेवेतील नियमित व नियमितेतर आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी (कार्याव्ययी आस्थापनेवरील, रोजंदारीवरील, अंशकालीन, मानसेवी इत्यादी) तसेच तदर्थ तत्वावर नेमणुका करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचारी अशा सर्व प्रकारच्या अधिकारी, कर्मचारी यांची माहिती संकलित करण्यात येणार आहे. यासाठी १ जुलै २०२३ दिनांकास आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी यांची इत्यंभूत माहिती तसेच माहे जुलै-२०२३ या महिन्याच्या संपूर्ण वित्तलब्धीची तपशीलवार माहिती जमा करण्यात येत आहे.

माहिती संकलित करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून संगणकीय आज्ञावली तयार करण्यात आली आहे. या आज्ञावलीत माहिती नोंदणीसाठी लॉगीन आयडी व पासवर्ड लातूर जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून संबंधित कार्यालय प्रमुखांना उपलब्ध करून देण्यात येतील. १७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२३ या कालावधीत हे लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घ्यावेत. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी माहिती ऑनलाईन भरावे व जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून पहिले प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावी. तसेच १ डिसेंबर २०२३ ते २८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्रुटींचे निवारण करून माहिती बरोबर असल्याचे जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून दुसरे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. अधिकारी, कर्मचारी यांची माहिती भरल्यानंतर जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून मिळणारे प्रमाणपत्र माहे नोव्हेंबर २०२३ आणि माहे फेब्रुवारी २०२४ च्या देयकासोबत जोडणे बंधनकारक आहे. याशिवाय वेतन देयके स्वीकारली जाणार नाहीत.

नियोजन विभागाच्या ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या परिपत्रकातील वेळापत्रकानुसार जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करून शासकीय कर्मचारी गणना २०२३ बाबतचा माहितीकोष तयार करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक उ. म. हत्ते आणि सहायक संशोधन अधिकारी एस. पी. बोदडे यांनी केले आहे.

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

लातूर : येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी सहावीत प्रवेशासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास १७ ऑगस्ट २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शेवटच्या दिवसांमध्ये वेबसाईटवर तणाव येत असल्याने पालकांनी ऑनलाईन अर्ज लवकरात लवकर भरावेत, असे आवाहन जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य मनोज कुमार जोशी यांनी केले आहे.

प्रवेश प्रक्रियाची सर्व माहिती https://navodaya.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेश अर्ज निशुल्क ऑनलाईन भरण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, म्हणून प्रथम नवोदय विद्यालय समितीच्या वेबसाइटवरील प्रमाणपत्र डाउनलोड करून घेऊन इंटरनेटवर ऑनलाईन अर्ज भरावा. ऑनलाईन अर्ज https://cbseitms.rcil.gov.in/nvs किंवा https://navodaya.gov.in या वेबसाइटवरुन भरावेत. प्रमाणपत्रावर पाचवीत शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांचा सही शिक्का, पालकांची सही, विद्यार्थ्यांची सही व फोटो असणे आवश्यक आहे .

इयत्ता सहावीसाठी निवड चाचणी परीक्षेस बसणारा विद्यार्थी इयत्ता तिसरी, चौथीमध्ये सलगपणे उत्तीर्ण होऊन कोणताही खंड न पडता पाचवीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये लातूर जिल्ह्यात शिकत असावा. त्याचा जन्म १ मे, २०१२ ते ३१ जुलै, २०१४ (दोन्ही दिवस पकडून ) दरम्यानचा असावा. त्याचे पालक लातूर जिल्ह्याचेच रहिवासी असावेत अन्यथा ते प्रवेश अर्ज भरण्यास अपात्र असतील. ही परीक्षा २० जानेवारी, २०२४ रोजी जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. इतर मागास (ओबीसी) प्रवर्गात अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२४ पूर्वी भारत सरकारचे इतर मागास प्रवर्गाचे (ओबीसी- फॉर्म नंबर.०९ ) जात प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे. एकदा अर्ज भरल्यानंतर त्यात बदल करता येत नसल्याने अर्ज भरताना परीक्षेचे माध्यम, वर्ग, शहरी/ग्रामीण, मुलगा/मुलगी, जन्म तारीख अचूक असल्याची खात्री केल्यानंतरच ऑनलाईन अर्ज जमा करावा .

आधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत लातूर जवाहर नवोदय विद्यालयाचे प्रवेश परीक्षा प्रभारी बी डी. शेख (भ्रमणध्वनी क्र. ९८१७८३४९३०), व्ही. एच. खिल्लारे (भ्रमणध्वनी क्र. ९८६०५६८८४०) यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य श्री. जोशी यांनी केले आहे.

# 'अधिकारांवरून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांमध्ये कोल्ड वॉर'; विजय वडेट्टीवारांची टीका

मुंबई : राज्यातील त्रिकूट सरकारमुळे राज्य अधोगतीकडे जात आहे. राज्यात सध्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांमध्ये अधिकारांवरून कोल्ड वॉर सुरू आहे, अशी टीका राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वॉर रुम तयार केली असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकताच पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या संदर्भात बैठक घेतली. प्रकल्पांना गती देण्यासाठी पवार यांनी आपल्या स्तरावर मॉनिटरिंग कक्ष कार्यान्वित केला आहे. वॉर रुम कार्यरत असताना अजित पवार यांनी नव्यानं मॉनिटरिंग कक्ष स्थापन केल्यानं हे मुख्यमंत्र्यांच्या अधिकारावर अतिक्रमण असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काल, गुरूवारी लोकसभेत अविश्र्वास प्रस्तावावर भाष्य केलं. यावर विजय वडेट्टीवार यांनी जोरदार टीका केली आहे. पंतप्रधानांना मणिपूरवर बोलायचं होतं, परंतु ते मेघालय, राजस्थानवर बोलले. तसंच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ७५ टक्के भाषण केवळ काँग्रेसवरच होतं. त्यांच्या मनात काँग्रेस संदर्भात भीती आहे, म्हणूनच त्यांनी भाषण हे काँग्रेसवर केलं, अशी टीका वडेट्टीवारांनी केली. पंतप्रधानांचं भाषण म्हणजे खोटं बोला रेटून बोला, एवढचं त्या भाषणाचं सार आहे, असंही वडेट्टीवार म्हणाले. विशेष म्हणजे, राहुल गांधींनी मांडलेल्या प्रश्नाचं उत्तर त्यांना देता आलं नाही, म्हणून पंतप्रधानांनी आपल्या भाषणाची दिशा बदलली, हे आता स्पष्ट झाल्याचंही विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले.

राहुल गांधी सभागृहात ३६ मीनिटं बोलले होते परंतु त्यातील केवळ ४ मीनिटं त्यांच्यावर कॅमेरा होता. यावर उत्तर देताना, विजय वडेट्टीवार म्हणाले की, राहुल गांधींना संपूर्ण भाजप घाबरलं आहे. एक खौफ त्यांच्या नावाचा निर्माण झाला आहे. गांधींची भीती या भाजपला आहे. गांधी, नेहरू यांनी देशासाठी बलिदान दिलं आहे. हे सर्व जे काही आहे, गांधींनी हा देश उभा करण्याचं काम केलं आहे. ज्या देशात काहीही नव्हतं तो देश जर आता स्वबळावर उभा राहिला असेल तर तो गांधी आणि नेहरूंमुळे झाला आहे. त्यामुळे गांधी नावाची दहशत अजूनही भाजपला आहे, असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**NOTICE INVITING TENDER**

The Executive Engineer, MSEDCL, O & M Division Udgir, on the behalf of MSEDCL invites bids from eligible bidder through E-tendering tender for the following work. The interested biders are requeste to login to MSEDCL web site **www.mahadiscom.in/etender/etender.**

| Sr | Tender No | Name of Work | Amount (In Lakhs) | Date |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/UDG/TS/ T-20/2023-24 | Work contract To & fro Transportation of failed, repaired distribution transformer from agency to Filter unit and vise versa and with Loading/ Unloading & Stacking of various capacity Distribution Transformers for (Repair agency work) and line and scrap material, meters, miscellaneous MSEDCL material at Udgir Division FU or to anywhere in Udgir Division area as and when required. | 20.00 | Sale from 11.00 hrs 11.08.2023 & last date of submission is 17.08.2023 upto 12.00 Hrs. |

MSEDCL reserves the right to acept any tender or to reject of all tenders without asinging any reason theroff.
Contact person Executive Engineer, Mobile-7875762013 E-mail:- eeudgir@mahadiscom.in

Executive Engineer,
MSEDCL, O & M Division, Udgir

PRO No.LTRZ/54 Dt. 12/7/2023

**CHANGE IN NAME**

I have change my name from **DHULLAPPA PRABHUAPPA JAWALE To DHULAPPA PRABHUAPPA JAWALE** Hence for this declaratlon in future.
**OLD NAME:- DHULLAPPA PRABHUAPPA JAWALE**
**NEW NAME :- DHULAPPA PRABHUAPPA JAWALE**
In future the same name will be used by my spouse and children.
**Address: JAWALE NIWAS, DAYARAM ROAD, NEAR GODAWARI SCHOOL, LATUR, LATUR MAHARASHTRA, 413512**
**Mobile No: 9422472B16**

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **YOUNUS SYED VALI PATEL SYED TO : YUNUS VALIPATEL SAYYAD** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **YUNUS VALIPATEL SAYYAD** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME : YOUNUS SYED VALI PATEL SYED**
**NEW NAME : YUNUS VALIPATEL SAYYAD**
**ADDRESS : PATEL NAGAR, OPP MASJID RING ROAD, LATUR**

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते